Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ४१] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ३०, २०२१-जानेवारी ५, २०२२/पौष ९-१५, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८२.

अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये, सुधारित मंजूर विकास योजनेत फेरबदल करणेबाबत

क्रमांक नपका-न.र.वि.-४३१२-२०२१.—

नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२४१९-१७५-सी.आर.१७६(ए)-२०१९-युडी-०९, दिनांक १६ सप्टेंबर २०१९ अन्वये कामठी नगरपरिषदेची सुधारित विकास योजना मंजूर झालेली आहे.

आता, नगर परिषदेने ठराव क्र. २०, दिनांक ०९ सप्टेंबर २०२१ अन्वये सुधारित मंजूर विकास योजनेत खालील बदल करण्याचे सूचविले आहे. सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक २७ मधील शेत सर्वे क्रमांक ५०/२/३ व ५०/२-३ “ गार्डन ” ऐवजी “ रहिवाशी ” या प्रयोजनाकरीता राखीव हा बदल करण्याचे ठरविले आहे.

सदरहु प्रस्तावित फेरबदल दर्शवणारा नकाशा तयार करण्यात आला असून तो नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये जाहीर करण्यात येते की, सदरहु फेरबदलासंबंधी कोणाच्याही सूचना अथवा हरकती असल्यास ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० (तिस) दिवसांचे आत अध्यक्ष, नगर परिषद, कामठी यांच्याकडे लेखी सादर करावे म्हणजेच प्रस्तावित फेरबदल शासनाला मंजुरीसाठी सादर करतेवेळी, त्यांचा योग्य तो विचार करता येईल.

कामठी :
दिनांक २३ डिसेंबर २०२१.

मो. शहाजहा शफात अंसारी,
अध्यक्ष,
नगर परिषद, कामठी.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८३.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

MODIFICATION UNDER SECTION 37*(1)* OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. MCK-TPD-4312-2021.—

The Revised Development Plan of Kamptee has been sanctioned by the Government of Maharashtra Urban Development Department *vide* it's Resolution No. TPS-2419-175-C.R.176(A)-2019-UD-09, date 16-09-2019.

Now, the Municipal Council, Kamptee has resolved to make changes in the santioned revised Development Plan of Kamptee *vide* it's Resolution No. 20, dated 09th September 2021 the Site No. 50/2/3 & 50/2-3, Reservation No. 27, reserved for " Residential Purpose " Instead of " Garden ". The Plan of proposed modification is prepared and kept open in the office of the Municipal Council, Kamptee during office hours for inspection of public.

Now, in pursuance of Section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 it is hereby notified that any persons having any objections and suggestions regarding the proposed modification may communicate in writing to the President, Municipal Council, Kamptee within a period of 30 (Thirty) days from the date of publication of this Notification in " *Maharashtra Government Gazette*."

Kamptee :
Dated the 23rd December 2021.

MO. SHAHAJAH SHAFAT ANSARI,
President,
Municipal Council, Kamptee.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८४.

अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून

क्रमांक नपब्र-नियोजन व विकास-४८०-२०२१.—

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस-२२९९-१००१-प्र.क्र.-१११-नवि-९, मुंबई दिनांक २८ जून २००२ अन्वये विकास योजना ब्रम्हपुरी भागशः मंजूर असून, ती दिनांक २८ जून २००२ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्रमांक टीपीएस-२२९९-१००१-प्र.क्र. १११-भाग-२ नवि-९, दिनांक १३ जुलै २००५ अन्वये मंजूर झालेली आहे.

नगर परिषद ब्रम्हपुरीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये उपरोक्त मंजूर विकास योजना ब्रम्हपूरी मध्ये खाली दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्याचे प्रस्तावित केले आहे.

विवरण

अ.क्र.	भूमापन क्रमांक	क्षेत्र आराजी	विकास योजनेतील	नियोजित उपयोग	न.प. सर्वसाधारण विशेष सभा दिनांक	ठराव क्रमांक
(१)	(२)	(३) हे. आर	(४)	(५)	(६)	(७)
१	मौजा-ब्रम्हपुरी भुमापन क्र. २७/१अ/४	० ९२	शेतीचे झोन	रहिवास वापर	२९ ऑक्टोबर २०२१	१०
२	मौजा-ब्रम्हपुरी भुमापन क्र. २७/२	० ८०	शेतीचे झोन	रहिवास वापर	२९ ऑक्टोबर २०२१	११

उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा व त्यासंबंधी माहिती अहवाल ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाचे वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये असे उद्‌घोषीत करण्यात येते की, नियोजीत फेरबदलासंबंधी कोणाला काही आक्षेप अगर सूचना असतील तर त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत (३० दिवसात) अध्यक्ष नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचेकडे लेखी सादर करावयात. जेणेकरून नियोजित फेरबदलाचा प्रस्ताव (कोणत्याही सुधारणा असल्यास त्यासह) मंजुरीसाठी राज्य शासनाकडे सादर करता येईल.

ब्रम्हपुरी :
दिनांक २० डिसेंबर २०२१.

सौ. रिता दिपक उराडे,
अध्यक्षा,
नगर परिषद, ब्रम्हपुरी.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८५.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

No. MCB-Planing-480-2021.—

Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralay, Mumbai *vide* there Notification No. TPS-2299-1001-111-UD-9-part-1, Dated 28th June 2002, sanctioned, Part of the Draft Development Plan of Bramhapuri and Excluded parts of the said Development Plan sanctioned *vide* Government Notification No. TPS-2299-1001-111-UD-9-part-2, Dated 13th Jully 2005.

The Municipal Council, Bramhapuri proposed to make minor modification in the aforesaid sanction Development Plan under Section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The Details about Proposed minor modification are as below.

DESCRIPTION

Sr. No.	Mouza/Survey No.	Area in	Present Use	Proposed use after Modification	Municipal Council General/Special Meeting	Resolution No.
(1)	(2)	(3) H. R.	(4)	(5)	(6)	(7)
1	¨Mouza-Bramhapuri Survey No. 27/1A/4	0 92	Agriculture Zone	Residental	Date-29 October 2021	10
2	¨Mouza-Bramhapuri Survey No. 27/2	0 80	Agriculture Zone	Residental	Date-29 October 2021	11

The plan and reports containing the description of above modification can be seen in the office of the Municipal Council, Bramhapuri during the office hours.

Now, in purpose of Section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 it is hereby notified that any suggestion or objection to the proposed modification as details above shall communicate the same in writing to the undersigned within period of the month (30 days) from the date of notification published in the *Government Maharashtra Gazette*.

The objection or suggestion if any received within above period will be considered before submitting the proposal to the Government.

Bramhapuri :
Dated the 20th December 2021.

SAU. RITA DIPAK URADE,
President,
Municipal Council, Bramhapuri .

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.